# पालक-शिक्षकांची चौथी कार्यकारी समिती बैठकीची सूचना
## कार्यकारी समिती - पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
## २०२०-२०२१

न.:२०-२१/०४
शाळेचे नाव: पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल
दिनांक: १८ जुन, २०२१

प्रति,
कार्यकारी समितीचे सदस्य

विषय:- कार्यकारी समितीच्या बैठकी बाबत...

प्रिय पालक,

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था ( शुल्क नियमन), अधिनियम, २०११ (२०१४ चा महा सातवा) च्या कलम ४ (२) (ई) च्या तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र शैक्षणिक नियम ८ (१) नुसार वर उल्लेखलेल्या विषयाच्या संदर्भात संस्था ( शुल्क नियमन), नियम २०१६, पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल (२०२०-२०२१) च्या पालक - शिक्षक संघटनेच्या कार्यकारी समितीची चौथी बैठक शनिवार, दिनांक २६ जुन २०२१ रोजी सकाळी १०:३० वा. ही बैठक मायक्रोसॉफ्ट टीमच्या ऑनलाई प्रणाली द्वरा घेण्यात येईल. व आम्ही शनिवार, दिनांक २५ जुन २०२१ रोजी बैठकीची लिंक सामायिक करणार आहोत. आपण या बैठकीसाठी स्वत: उपस्थित राहावे ही विनंती.

महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क नियमन) , नियम, २०१६ च्या नियम ८ (३) च्या तरतुदीनुसार , एकूण सदस्य संख्येच्या एक तृतीयांश सदस्य सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे. आणि एकूण पालक सदस्य संखेच्या पन्नास टक्के पालक सदस्य उपस्थिती आवश्यक आहे. सभा पूर्ती साठी आवश्यक असलेली किमान गणसंख्येची पूर्ती न झाल्यास समितीचे अध्यक्ष अर्ध्या तासांसाठी बैठक स्थगित करतील. किमान गणसंख्या नसल्यास , कोणताही विषय सभेत हाताळला जाणार नाही. प्रस्तुत नियमामध्ये नमूद केल्या प्रमाणे सभा रद्द केली जाईल आणि पंधरा दिवसांनी सभा परत बोलवली जाईल.

### विषय पत्रिका

१. उपस्थितांचे स्वागत
२. २०२०-२१ चा अहवाल वाचन, (ऑनलाइन शाळा आणि साथीचा रोग)
३. २०२०-२१ ई.पी.टी.ए सदस्यांचे आभार

आपली नम्र,
श्रीमती रमा पुरंदरे
सचिव
कार्यकारी समिती
पी.आय.सी.टी मॉडेल स्कूल